**खटला क्र. ९३/पीडब्ल्यु/२०१६** **निशानी क्र. २१**

साक्षीदार क्र. २
मी शपथपुर्वक सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | श्री. राजमोगली शिवलिंगम बुरला, |
| वय | : | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | : | वॉचमन, |
| पत्ताा | : | दादर, मुंबई. |

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील :—**

१. मी आरोपी रवीकांत याला ओळखतो. मी दुसऱ्या आरोपीला ओळखत नाही. साक्षीदाराने आरोपी क्र. १ रवीकांत याला बोट दाखवून ओळखले आहे. दिनांक २१/१०/२०१५ रोजी मी इंडिया बुल्स फायनान्स सेंटर येथे सुपरवायझर या पदावर काम करित होतो. माझ्या कामाची वेळ सकाळी ०७:०० ते रात्री ०७:०० पर्यंत होती. त्या दिवशी माझी गेट क्र. ८ वर सिक्युरिटी गार्ड म्हणून डयुटी होती. त्या दिवशी दुपारी ०२:०० ते ०२:३० च्या सुमारास गेट क्र. ८ समोर एक महिला छोटया मुलाला घेवून उभी होती. आरोपी क्र. १ रवीकांत हा तेथे येत होता. त्या महिलेने आरोपी क्र. १ रवीकांत याला विनंती केली की, कोणी टॅक्सीवाला माझे ऐकत नाही, तर मला टॅक्सी मिळवून देण्यास मदत करा. आरोपी क्र. १ रवीकांत याने एका टॅक्सीवाल्याला सांगितले की, या महिलेचा मुलगा आजारी आहे, तर त्या दोघांना दवाखान्यात घेवून जा. टॅक्सीवाल्याने त्या महिलेला व तिच्या मुलाला टॅक्सीने दवाखान्यात घेवून जाण्यास नकार दिला. आरोपी क्र. १ याने पुन्हा त्या टॅक्सीवाल्याला विनंती केली की, या महिलेला घेवून जा. टॅक्सीवाला आरोपी क्र. १ याला म्हणाला की, तू इकडचा भाई आहेस का ? त्यानंतर काय झाले हे मला माहिती नाही.

**सरकारी वकीलांनी साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची परवानगी मागितली, कारण तो त्याच्या पूर्वीच्या बयानावरून फिरत आहे. परवानगी दिली.**

**उलटतपासणी सरकारी वकील** :—

२. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी आरोपी क्र. १ सोबत आरोपी क्र. २ देखील होता. पोलीसांनी माझी घटनेविषयी चौकशी केली होती.

हे म्हणणे खरे नाही की, इतर टॅक्सी चालक हे जेवण करित आहेत असे फिर्यादी टॅक्सी चालक याने रवीकांत याला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ याने त्या टॅक्सी चालकास झापड मारली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोन्हीही आरोपींनी फिर्यादी टॅक्सी चालकास नाका—तोंडावर मारहाण केली, त्यामुळे त्याच्या नाका—तोंडातून रक्त निघत होते. हे म्हणणे खरे नाही की, टॅक्सी चालकास आरोपी क्र. १ रवीकांत म्हणाला की, इथून निघून जा. आता मला माझ्या जबाबातील **अधोरेखांकित भाग अ** वाचून दाखविला असता, तसे मी पोलीसांना सांगितले नव्हते व पोलीसांनी तसे का लिहिले याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ हा मला आज न्यायालयात भेटला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी ॲड. कुमारी डिंपल म्हात्रे आरोपीकरिता** :—

३. उलटतपास नाकारला.

**फेर तपास :—**

४. काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—

**(जे.पी. शिराळे)**

**अति. मुख्य महानगर दंडाधिकारी,**

**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०१/११/२०२३.**